भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र.४०८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०५/२०१७

**१) बनावट धनादेश देवुन फसवणुक करुन उसने दिलेले पैसे परत करण्यास नकार दिल्याने गुन्हा नोंद .:-**

मार्च २०१६ ते २४/५/२०१७ पर्यत. यातील फिर्यादी आशिष लक्ष्मीकांत फुलबांधे वय ३६ वर्ष, रा. सोमवारी वार्ड पवनी यांनी आरोपीला व्यापार करण्याकरिता विश्वासाने एक लाख सत्तर हजार रुपये दिले असता आरोपी याने फिर्यादी यास बनावट धनादेश देवुन उसनें दिलेले पैसे परत करण्यास नकार देवुन उलट फिर्यादी यास जे जमते ते करुन घे अशी धमकी दिल्याने मा. प्रथम वर्ग न्यायालय रिपोर्ट दाखल केली असता आज रोजी मा. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग पवनी यांचे आदेश क्र. ३२७/१७ कलम १५६(३) सीआरपीसी अन्वेय आदेशाने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४२०,४१७,४०६,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलगी घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद .:-**

दिनांक १३/०५/२०१७ चे १०.०० ते आज पावेतो यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष, ४ महिने २३ दिवस ही दिनांक १३/०४/२०१७ ला मानेगाव येथे ११ वी चे पेपर देण्यास गेली होती व तेथुन भंडारा येथे बहिनीकडे जाते असे सांगुन बहिनीकडे व घरी परत न येता कुठे तरी निघुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व शासन परीपत्रक क्रं. सी.आरटी./०९१२/प्र.क्र.५४/पोल-१३ गृह विभाग १०/११/२०१४ अन्वये पोस्टे. कारधा येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मेश्राम पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) घराचे वादावरुन भांडण शिवीगाळ करुन लाकडी झिल्पीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद .:-**

दिनांक ०५/०५/२०१७ चे १०.०० वा. दरम्यान. यातील आरोपी हिने घराचे वादावरुन फिर्यादी सोबत तोंडा तोंडी भांडण करुन शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली व एका लाकडी झिल्पीने फिर्यादीचे डावे हाताचे करंगडी जवळ मारुन जखमी केल्याने फिर्यादी श्रीमती दयावती दलीराम मेश्राम वय ५५ वर्ष, रा. वाकेश्वर यांचे तोंडी व डॉक्टरी एक्सरे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२५,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगांडे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन क्षुल्लक कारणावरुन भांडण शिवीगाळ करुन थापड बुक्यांनी, कुऱ्हाडीचे दांडयाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक २१/०५/२०१७ चे १८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी विनोद नानाजी ढोके वय ३७ वर्ष, रा. आवळी यांचे शेतातील धुऱ्यावरील सुबाभळीचे झाड हवेमुळे बांधीत पडल्याने यातील आरोपी क्रमांक १ ने त्या झाडाच्या काडया तोडुन आपल्या शेतात नेल्याने फिर्यादीने आरोपी क्र. १ ला हटकले असता आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस शिवीगाळ करुन थापड बुक्यांनी मारहान केले व आरोपी क्र. १ ने फिर्यादीचे उजव्या हातच्या मनगटावर कुऱ्हाडीचे दांडयाने मारुन त्यास मुका मार लागल्याने सुजन आल्याने फिर्यादीचे बयान व डॉक्टरी एक्सरे रिपोर्ट वरुन पोस्टे. लाखांदुर येथे कलम ३२५,५०४,५०६,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोयर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**५) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :-**

**अ)** दिनांक २४/०५/२०१७ चे १९.१५ वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या ठिकाणी उभी करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोशि. धावळे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. तुमसर येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. धार्मीक पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**ब)** दिनांक २४/०५/२०१७ चे २०.०० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या ठिकाणी उभी करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोशि. धावळे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. तुमसर येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. धार्मीक पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**६) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक २४/०५/२०१७ चे १८.३० ते १९.०० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील टाटा मॅजीक वाहन आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या ठिकाणी उभी करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. जटाळ यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. सिहोरा येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जटाळ पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**७) विष प्राषन केल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :-**

दिनांक १८/०५/२०१७ ते १९.०० ते १९/०५/२०१७ चे ०९.३० वा. दर. यातील मृतक देवराम दशरथ शेंन्डे वय ३६ वर्ष, रा. मालंदा याने विष प्राषन केल्याने त्यास त्याची पत्नी सौ. किर्ती देवराम शेन्डे हिने मृतकला औषधोपचाराकरीता उपजिल्हा रुग्णालय साकोली येथे नेले असता तेथे डॉक्टरने तपासुन मरण पावल्याचे घोषीत केल्याने डॉक्टरी मेमो वरुन पो.स्टे साकोली येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. सार्वे पोलीस स्टेशन दिघोरी यांचे रिपोर्ट वरुन कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

८) विषारी सापाने चावा घेतल्याने उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु . :–

दिनांक २४/०५/२०१७ चे ०९.०० वा. दर. यातील मृतक सौ. चंद्रकला मनोहर नगरकर वय ४० वर्ष, रा. विहीरगाव /बुराडया ही धानाचे पोते खाली झालेले उचलुन बाजुला करीत असतांना मृतकचे उजव्या हाताचे पंज्याला कोणत्यातरी विषारी सापाने चावा घेतल्याने मृतक हिचा सरकारी दवाखाना सानगडी येथे उपचार करुन पुढील उपचारा करीता सरकारी दवाखाना साकोली येथे नेले असता डॉक्टरानी तपासुन मृत घोषीत केल्याने फिर्यादी बेनीराम मुरलीधर नगरकर वय ३९ वर्ष, रा. विहीरगाव/बुराडया तोंडी व डॉक्टरी मेमो वरुन पो.स्टे साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

९) अवैध देशी दारु/ जुगार अडयावर धाडी . :–

दिनांक २४/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. भंडारा व साकोली येथे अवैध देशी दारु/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १५ लिटर हातभट्टी दारु किंमती १५००/–रु. व जुगारातुन ९५/–रु. असा एकुण किंमती १,५९५/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २४/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२ तीन सिटर वाहनांवरती १६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

PSI

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.